# मुकुल माधव फाऊंडेशनतर्फे केईएम रुग्णालयातील एनआयसीयू वॉर्डमध्ये विशेष कक्ष सुरु

पुणे : मुकुल माधव फाऊंडेशनतर्फे केईएम रुग्णालयातील नवजात



अतिदक्षता कक्ष (एनआयसीयू)सुरू करण्यात आला असून या कक्षाचे नामकरण सोनाली-द-लिटल स्टार्स रूम असे करण्यात आले आहे.

या कक्षाचे उद्घाटन स्पायका इलास्टीक प्रा. लिमिटेडचे संचालक रजनीकांत जैठा यांच्या पत्नी आशा जैठा यांच्या हस्ते झाले. यावेळी फिनोलेक्स इंडस्ट्रीजचे व मुकुल माधव फाऊंडेशनचे संस्थापक प्रल्हाद छाब्रिया, फिनोलेक्स इंडस्ट्रीज लिमिटेडचे व मुकुल माधव फाऊंडेशनचे अध्यक्ष प्रकाश छाब्रिया, मुकुल माधव फाऊंडेशनच्या व्यवस्थापकीय विश्वस्त रितु छाब्रिया, केईएम रुग्णालयाचे चिकित्सा निर्देशक डॉ. के. जे. कोयाजी, बालतज्ज्ञ विभागाचे निर्देशक डॉ. ए. एन. पंडित, स्पायका इलास्टीक प्रायव्हेट लिमिटेडचे मनिष व मनिषा जैठा व मुकुल माधव फाऊंडेशनच्या विश्वस्त गायत्री छाब्रिया आदी उपस्थित होते.